# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. रातुमनावि/म.वि.वि./ 9974 दि. 23/०२/२०१८.

प्रति,

१. प्राचार्य
सर्व संलग्नित व संचालीत महाविद्यालये,
२. सर्व विभाग प्रमुख,
विद्यापीठाचे पदव्युतर विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर

**विषय :– सत्र २०१८–१९ पासून सर्व पदवी व पदव्यूतर अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने करण्याचे दृष्टीने महाविद्यालयात सुरु असलेल्या संलग्नित संपुर्ण अभ्यासक्रमांची माहिती सादर करण्याबाबत.**

संदर्भ :– शासन निर्णय क्र. टिईएम–२०१५/प्र.क्र. ३२५/तांशि–४, दि. २० जुलै, २०१६.

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे संदर्भांकीत पत्राद्वारे ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्य शासनाद्वारे केंद्रीय पध्दतीने करण्यात येत नाही. अशा सर्व **पदवी व पदव्यूतर** अभ्यासक्रमांचे प्रवेश विद्यापीठामार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबतचे निर्देश दिलेले होते. दरम्यान याविषयी अंतर्गत कामकाजाकरिता सर्व समावेशक ' एकसंघ संगणक प्रणाली पध्दती' उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्यामुळे सत्र २०१७–१८ चे सर्व प्रवेश केन्द्रीय पध्दतीने न करता महाविद्यालयीन स्तरावर करण्यात आले असल्यामुळे वरिल प्रक्रिया खोळंबलेली आहे. त्यामुळे सत्र २०१८–१९ पासून ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्य शासनाद्वारे केंद्रीय पध्दतीने करण्यात येत नाही अशा सर्व **पदवी व पदव्यूतर** अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने विद्यापीठ स्तरावर करण्याचे विद्यापीठाद्वारे ठरविण्यात आले आहे. सदर योजना प्रभावीपणे व बिनचूक पध्दतीने राबविण्याकरिता सर्व संलग्नित, संचालीत व विद्यापीठातील पदव्युतर विभागात सुरु असलेल्या सर्व अभ्यासक्रमांची इंतभुत माहिती संकलीत करणे गरजेचे आहे.

**करिता आपणांस विनंती करण्यात येते की, विद्यापीठाच्या https://www.nagpur.university या वेबपोर्टलवरील महाविद्यालय विकास विभागाच्या लिंकवर जाऊन विहीत प्रपत्रात माहिती दिनांक १० मार्च, २०१८ पर्यंत किंवा तत्पुर्वी न चूकता Online अपलोड करावी. तसेच सदर माहितीची हार्ड कॉपी संपुर्ण कागदपत्रांसह दिनांक १५ मार्च, २०१८ पुर्वी महाविद्यालय विकास विभागाला सादर करावी.**

जी महाविद्यालये/विभाग उपरोक्त मुदतीत विहीत प्रपत्रात महाविद्यालयाची/विभागातील अभ्यासक्रमांची माहिती सादर करणार नाहीत व त्यामुळे सदर प्रक्रिया राबवितांना काही चूका झाल्यास किंवा महाविद्यालयाचा/विभागाचा सदर प्रक्रियेत समावेश न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाचे/विभागाचे, प्राचार्य/विभाग प्रमुख स्वत: जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू

(डॉ.रमण मदने)
नोडल अधिकारी तथा
सहायक कुलसचिव